# दुसऱ्या महायुध्द काळातील कामगार लढा (१९३९-४५)

प्रभारी प्राचार्य डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण[१] , श्री. संजय बब्रुवान कांबळे[२]
[१]वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय , सोलापूर.
[२]कुर्डूवाडी, सोलापूर.



## प्रस्तावना

३ सप्टेंबर १९३९ रोजी दुसरे महायुध्द सुरु झाले. युध्द काळात उत्पादन वाढवण्यासाठी कारखान्यातल्या दोन पाळयांच्या जागी तीन पाळयात काम सुरु झाले. रात्र पाळी सर्वत्र सुरु झाली. अनेक ठिकाणी कामाचे तास वाढवण्यात आले. रजा कमी केल्या, अनेक कारखाने फॅक्टरी ॲक्ट विसरले. नवीन अध्यादेश काढून ज्यूट, इंजिनीअरींग, रसायने इत्यादी उद्योगात जिथे युध्द प्रयत्नात प्रत्यक्ष पुरवठा होत असेल तिथे कामाचा भार वाढविण्यात आला. अल्पवयीन कामगार, महिला कामगार यांची बेधडक भरती करण्यात आली. आधीचे याबाबतीतले नियम धाब्यावर बसवण्यात आले. युध्द काळात नवे लहान कारखाने उभारले गेले. अवजड धोकादायक यंत्रावर पूर्णपणे प्रशिक्षीत नसलेले व अनुभव नसलेले कामगार ठेवण्यात आले. युध्दासाठी उत्पादन हा एकच मंत्र सगळीकडे जपण्यात येत होता. याचा परिणाम , अपघात वाढत गेले. १९३९ साली अखिल भारतीय पातळीवरील विविध कारखान्यातून झालेल्या अपघातांची संख्या ३६,००० नोंदलेली होती ती वाढून १९४५ मध्ये ७०१२३ झाली. प्रत्येक हजार कामगारांमागे भारतात अपघाताचे प्रमाण सन १९३९ मध्ये २०.५६ इतके होते हे प्रमाण वाढून १९४४ मध्ये ते २६.६९ दर हजारी झाले होते.

जून १९४० मध्ये गव्हर्नर जनरलने नॅशनल सर्व्हीसेस, टेक्निकल पर्सनेल (राष्ट्रीय सेवा-तंत्रविशारद कामगार) नावाचा वटहुकूम काढला. या वटहुकूमाच्या तरतूदीप्रमाणे १८ वर्षापासून ५० वर्षापर्यंत वयाची कुणीही व्यक्ती ती तंत्रज्ञ प्रशिक्षीत कुशल कामगार असेल, तर अशा व्यक्तीला सरकार जबरदस्तीने नॅशनल सर्व्हीसमध्ये कामाला लावू शकत होती. याबरोबरच सरकारने १९४१ मध्ये इसेन्शियल सर्व्हीसेस मेन्टेनन्स ऑर्डिनान्स (अत्यावश्यक सेवा वटहुकूम), १९४२ मध्ये मोटर व्हेयीकल ड्रायव्हर्स ऑर्डिनान्स (मोटार वाहन चालक वटहुकूम) रेल्वे एम्प्लॉयमेन्ट मिलिट्री पर्सोनेल ऑर्डिनान्स (रेल्वेतील नोकरी आणि लष्करी वाहतूक संबंधी वटहुकूम) काढण्यात आले. याबरोबरच डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टच्या कलम ७८-अ प्रमाणे विशेष अधिकार बहाल करुन काही खास अधिकारी नेमण्यात आले. हे खास अधिकारी कुठल्याही १८ वर्षावरील सक्षम पुरुष व्यक्तीला सक्तीने त्यांना आवश्यक त्या ठिकाणी हवे ते काम करावयास

लावू शकत होते. त्याचप्रमाणे या कायद्याप्रमाणे काम सोडणे, घरी बसणे, गैरहजर राहणे या सर्व बाबी गुन्हा ठरत होत्या. यामुळे मालक कुठलाही संप बेकायदा ठरवू शकत असत. इतकेच नव्हे तर संपाची नोटीस देणे, संपाचा मनोदय जाहीर करणे, हे पण गुन्हे ठरत होते. १९४५ पर्यंत अशा प्रकारच्या आरोपात ३००० कामगारांना शिक्षा झाल्या होत्या. १९२९ ते १९३६ या कालावधीत ३ लाख कोळसा खाण मजूर व मळे कामगार यांच्या उत्पन्नात सतत घट झालेली होती. १९३६ नंतर मजूरीचे दर जरा सुधारले. तरीसुध्दा १९४२ मध्ये या क्षेत्रातले मजूरीचे दर १९२९ च्या खालीच राहिले होते. रोजंदारी करणाऱ्या खाण मजूरांची दैनिक मजूरी या कालावधीत आठ आणे ते बारा आणे एवढीच होती. युध्द परिस्थीतीमुळे काही क्षेत्रात वेतन दर वाढले. तरी सभोवारच्या वाढत्या महागाईमुळे वाढीव दर त्वरीत व निरर्थक होत असे. म्हणजेच वेतनाचा आकडा वाढून हातात मिळणारी मजूरी मात्र कमी होत गेली.

याच्या अगदी विरुद्ध स्थीती भांडवलदार वर्गाची होती. खालील तक्त्यावरुन या काळात नोंदलेला नफ्यातील वाढीचा अधिकृत तपशील दिला आहे.

**विविध उद्योग क्षेत्रातील १९४० ते १९४५ या काळातील नफ्याचा सूचकांक (१९३९ = १०० आधार अंक)**

| वर्ष | सर्व उद्योग | ज्यूट | कापड | कागद | पोलाद | कोळसा | सिमेंट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४० | १३८.० | ३५९.१ | १४२.५ | २६३.३ | १०३.८ | १००.८ | १०२.८ |
| १९४१ | १८७.० | ३४४.४ | ३१६.६ | २८४.० | १३३.० | ८२.६ | १२८.८ |
| १९४२ | २२१.८ | ३५१.१ | ४९१.३ | ३२१.७ | ११०.१ | ८०.५ | १६९.१ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४३ | २४५.० | २७६.३ | ६४०.० | ३५२.८ | १११.८ | ९५.६ | १४७.९ |
| १९४४ | २३८.८९ | ३१०.६ | ४९२.१ | २७१.५ | ११७.८ | २३७.० | २१४.४ |
| १९४५ | २३३.६ | ३२७.६ | ४२३.३ | २७९.५ | १२०.८ | २५८.२ | २१६.६ |

**१९३९ ते १९४५ या काळातील कामगारांच्या परिणामकारक उत्पन्नाचा सूचकांक**

| वर्ष | उत्पन्न सूचकांक | अखिल भारतीय उपभोक्ता सुचकांक | परिणामकारक उत्पन्न |
|---|---|---|---|
| १९३९ | १०० | १०० | १०० |
| १९४० | १०५.३ | ९७ | १०८.६ |
| १९४१ | १११.० | १०७ | १०३.७ |
| १९४२ | १२९.१ | १४५ | ८९.० |
| १९४३ | १७९.६ | २६८ | ३७.० |
| १९४४ | २०२.१ | २६९ | ७५.१ |
| १९४५ | २१०.५ | २६९ | ७४.९ |

या दोन तक्त्यांवरुन कामगारांच्या उत्पन्नात झालेली मोठी घट सहज लक्षात येते. [१]

वेतनात सुधारणा घडूवन आणण्यासाठी भारतीय कामगार चळवळ या काळात अधिक व्यापक झाली. ए.आय.टी.यु.सी. आणि तिच्या प्रांतीय शाखा या सर्वांनी वेतनदरात वाढ करण्याची मागणी सार्वत्रिकपणे उचलून धरली. कामगार संघटना सरकारी कर्मचारी संघटना, रेल्वे-पोस्ट, गोदी, म्यूनसिपालिटी या सर्व खात्यातील कामगार संघटनांनी वेतनवाढीची मागणी लावून धरली. मुंबईत ट्रेड युनियन कॉंग्रेसने एक कृति समिती नेमून त्या समितीत विविध कामगार पुढारी सामील केले. महागाई भत्त्याच्या मागणीवरुन मुंबईत पहिला संप ५ मार्च १९४० रोजी झाला. त्यात १७५००० कापड गिरणी कामगार संपावर गेले. देशभर सर्व औद्योगिक केंद्रातून संप झाले. पुढील तक्त्यात १९३९ ते १९४५ या कालखंडात झालेल्या संपाची तीव्रता व व्याप्ती दिसून येते.

**औद्योगिक लढे १९३९-१९४५**

| वर्ष | संप-टाळेबंदी संख्या | प्रभावित कामगार संख्या | वाया गेलेले काम-दिवस |
|---|---|---|---|
| १९३९ | ४०६ | ४०९१८९ | ४९९२७९५ |
| १९४० | ३२२ | ४५२५३९ | ७५७७२८१ |
| १९४१ | ३५९ | २९१०५४ | ३३३०५०३ |
| १९४२ | ६९४ | ७७२६५३ | ५७७९९६५ |
| १९४३ | ७१६ | ५२५०८८ | २३४२२८७ |
| १९४४ | ६५८ | ५५००१५ | ३४७७३०६ |
| १९४५ | ८४८ | ७८२१९६ | ३३४०८९२ |

युध्द सुरु झाल्यापासून कामगारांनी संघटीत केलेला सर्वात मोठा लढा म्हणजे मुंबईमधिल २ ऑक्टोबर १९३९ रोजी पाळलेला **'युध्द-विरोधी दिन'.** यात ९०,००० कामगार सामील झाले. ५ मार्च १९४० रोजी सुरु झालेला १७५००० गिरणी कामगारांचा मुंबईलता संप म्हणजे भारतीय कामगार चळवळीतली महागाई भत्त्याच्या लढाईची सुरुवात होती. संप काळात कापड गिरणी कामगारांच्या महागाई भत्त्याच्या प्रश्नांवर सरकारने लवाद मंडळ नेमले. या लवाद मंडळाच्या शिफारशी कामगार संघटनांनी फेटाळल्या. लाल बावटा गिरणी कामगार युनियनने त्यानंतर संप आयोजित करण्यासाठी कृती समिती नेमली. ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेसने मुंबईतल्या गिरणी कामगारांना पाठिंबा देण्यासाठी सार्वत्रिक संपाची घोषणा केली. १० मार्च १९४० या दिवशी मुंबई प्रांतातल्या कामगारांनी सार्वत्रिक संप करुन गिरणी कामगारांना पाठिंबा जाहीर केला. संप कालावधीमधील १ एप्रिल १९४० या दिवशीची मील मधील उपस्थीती खाली दिली आहे. यावरुन लक्षात येईल की संप किती मोठ्या प्रमाणात व सार्वत्रिक होता.

**मिल कामगारांची यादी - १ एप्रिल १९४०**

| अ.क्र. | मिलचे नांव | उपस्थिती 9 A.M. | उपस्थिती 11 A.M. | सर्वसाधारण कामगार |
|---|---|---|---|---|
| १ | कोहिनूर / Kohinoor | ३५०० | ३५०० | ४२६५ |
| २ | स्प्रिंग / Spring | ३२५० | ३३४९ | ६४९४ |
| ३ | कुलाबा लॅन्ड (Colaba Land) | १६७१ | १६७१ | १६५४ |
| ४ | गोल्ड मोहूर (Gold Mohur) | १४०० | १४०० | १८४६ |
| ५ | इंडियन वुलन (Indian Woollen) | ७४० | ७४० | ८०० |
| ६ | Madhaxji Dharamsi | ५५० | ५५० | ११५० |
| ७ | Sassoon Alliance | ५५० | ५५० | ६०१ |
| ८ | Jacob Sassoon | ८०० | ८४५ | ३०७५ |
| ९ | Manchester | २०० | ३२१ | ७०५ |
| १० | Shri Nivas | ४०० | ८०० | २८०० |
| ११ | Rachel Sassoon | २७५ | २९५ | ११३८ |
| १२ | Khatav Makanji | ५० | ५० | २५८७ |
| १३ | Bombay Industrial | २०० | २०० | २७५ |
| १४ | Sir Shapurji | ३७५ | ४०० | १६८९ |
| १५ | Morarji Gokuldas | ४०० | ५०८ | ४२१४ |
| १६ | E.D.S.Turkey Red. Dye | २०० | २०० | ६०० |
| १७ | Tata | ७०० | ८५७ | ३१४५ |
| १८ | Meyar Sassoon | ४०० | ४०० | १२६८ |
| १९ | New Pralhad | ३५ | ३५ | २०७२ |
| २० | Madusudan | २० | २० | ३०९६ |
| २१ | Textile | Nil | Nil | ३०६० |
| २२ | David Nos. १ & २ | ४०० | ४०० | १०१० |
| २३ | Elphinstone | १७५ | १७५ | ९४८ |
| २४ | Finlay | २०० | २०० | २२९८ |
| २५ | Apollo | २७५ | २७५ | १४८० |
| २६ | Alexandra | १०० | १४५ | २३२४ |

याप्रमाणे १ एप्रिल १९४० या दिवशी कामगार मोठ्या प्रमाणात संपावर गेले. [२] याच दिवशीच्या दुसऱ्या मील मध्येही कामगारांची उपस्थिती खुपच कमी होती. ती पुढीलप्रमाणे,

**मील कामगारांची यादी १ एप्रिल १९४०**

| अ.क्र. | मिलचे नांव | उपस्थिती 9 A.M. | उपस्थिती 11 A.M. | सर्वसाधारण कामगार |
|---|---|---|---|---|
| १ | Swan | - | - | १०९२ |
| २ | Shri Ram | १५ | १५ | १५८० |
| ३ | Edward Sassoon | ९५ | ११५ | १३५६ |
| ४ | Western India | २० | २० | १६८० |
| ५ | New City of Bombay | ३५ | ५६ | १४४१ |
| ६ | Bombay Dyeing | १०४ | १०४ | २२० |
| ७ | New Kaiser-I-Hind | ४० | ४० | २४०९ |
| ८ | Seksaria | २० | २० | २५९७ |
| ९ | Modern No. २ | १५ | २५ | ६१३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | Phoenix | ८ | ८ | २२१३ |
| ११ | New Union | १५ | १५ | १७२० |
| १२ | Century | ८६ | २१० | ४५८७ |
| १३ | New Great Eastern | ४५ | १२० | २५०६ |
| १४ | Crown | - | १८९ | १७२९ |
| १५ | Hirgee | ५० | ५० | १४०० |
| १६ | Standard | - | - | २९७५ |
| १७ | New China | - | - | १६२३ |
| १८ | Modern No. १ | - | ४५ | ६५५ |
| १९ | Raghuvanmsi | ५० | ५० | १२०० |
| २० | Ruby | - | २५ | १०७३ |
| २१ | Dhanraj | १५ | १५ | १८६७ |
| २२ | Indian Mfg. | २५ | २५ | २२८६ |
| २३ | Bradbury | ३० | ४७ | १७९१ |
| २४ | Hindustan | ४० | ८५ | १६१२ |
| २५ | Simplex | ६० | ११८ | २३९६ |
| २६ | Dawn | १२ | १२ | २३०३ |
| २७ | E.D.Sassoon | १८ | १८ | २३२४ |
| २८ | Podar | ५ | ५ | ११७० |
| २९ | Sassoon Spg. & Wvg. | ४० | ७७ | ३०४५ |
| ३० | Indian Bleaching | - | - | ३६४ |
| ३१ | Kamala | ४० | ४० | २०६५ |

यापमाणे १ एप्रिल १९४० या दिवशी मोठ्या संख्येने संपावर गेलेल्या कामगारांची कल्पना येऊ शकेल.[३] या संपकाळात मुंबई शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मुंबईचे कमिशनर ऑफ पोलिस डब्ल्यू.आर.जी.स्मिथ यांनी २ एप्रिल १९४० रोजी एक हुकूम काढला. तो हुकूम पुढीलप्रमाणे होता

"ज्या अर्थी, लोकांच्या सुरक्षिततेकरीता व शांता राखण्यासाठी उपाय योजने आवश्यक आहे असे मला वाटते म्हणून, मी वॉल्टर रॉबर्ट जार्ज स्मिथ, कमिशनर ऑफ पोलिस, मुंबई सिटी पोलिस ॲक्ट १९०२ चे कलम २३ पोट कलम (२) (अ) व (ब) या खाली मला असलेल्या अधिकारान्वये पुढे नमूद केल्याप्रमाणे वेळेपूरता हुकूम काढीत आहे. आता मुंबई सिटी पोलिस ॲक्ट १९०२ चे कलम २३, पोट कलम (२) अ आणि (ब) या अन्वये मी असा हुकूम देतो की, मुंबई शहरात तारीख ४ एप्रिल सन १९४० रोजी सकाळपासून एक महिन्यापर्यंत सरकारी खात्यात असलेल्या नोकरांस त्यांच्यावरील अधिकाऱ्यांच्या हुकूमावरुन किंवा नोकरी बजावण्याकरीता हत्यारे बाळगावी लागतात. अशा नोकरांशिवाय इतर कोणाही इसमास मुंबई शहराच्या कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी तलवारी, भाले, सुऱ्या, चाकू, सोडगे, बंदूका, लाठ्या, काठ्या अगर इतर हत्यारे वापरण्याची किंवा दगड नेण्यास अगर त्यांचा साठा करण्यास किंवा त्या वस्तू फेकण्याची साधने तयार करण्यास मनाई आहे." [४]

जुलै १९३९ रोजी कलकत्ता येथील साऊथ जूट मिलमध्ये काही स्त्री कामगारांना बदली ऐवजी कायम करण्याच्या कारणावरुन साऊथ मिल मध्ये वादविवाद निर्माण झाले. वादविवाद वाढून त्याचे रुपांतर संपात झाले. या संपात स्त्री-पुरुष कामगारांनी भाग घेतला. या संपात जवळ-जवळ २००० स्त्री-पुरुष कामगारांचा जमाव मॅनेजरच्या ऑफिसकडे गेला व त्यांनी गोंधळ केला. दगडफेक, विजेच्या तारा तोडणे, इमारतीची मोडतोड करण्यास सुरुवात केली. ऑफीस मधील तीन मॅनेजर व इतर चारपाच युरोपियन अधिकारी आत्मरक्षणासाठी इमारतीमधील एका खोलीत बसले. एका रखवालदाराने पोलिसांना ही बातमी सांगितली. हत्यारबंद पोलिसांची तुकडी गिरणीच्या परिसरात शिरताच संपवाले इकडे-तिकडे पळू लागले. गिरण्याच्या सर्व दरवाज्यावर पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला. गोंधळ व संपास कारणीभूत ठरलेल्या स्त्री कामगार व इतर एकोनिस जनांना पोलिसांनी कैद केले. आणि या विभागात पोलिस अधिकाऱ्यांनी १४४ कलम लागू केले. [५]

१९४० साली बंगाल प्रांतातील विविध ज्यूट गिरण्यांमध्येही संप झाले यात कामगारांना दहा टक्के वेतनवाढ मिळवण्यात यश आले. ज्यूट गिरणी कामगार या विभागात झालेल्या अनेक संपात खालील महत्त्वाचे संप

१) मे १९४१ ,बरानगर ज्यूट मिल - ९००० कामगार संपावर.

२) जुलै १९४१, ॲंग्लो-इंडिया ज्यूट मिल - १२००० कामगार संपावर

३) १९४२, हेस्टींग्ज ज्यूट मिल - ४५०० कामगार संपावर
४) १९४२, ॲन्ड्रयुज ज्यूट मिल - २५००० कामगार संपावर.
५) १९४२ ,लॉरेन्स हुकूमचंद मिल - २०००० कामगार संपावर [६]

याशिवाय ढाका जिल्ह्यातील नारायणगंज येथील कापड गिरणी कामगारांचा संप १९३९-१९४० साली उल्लेखनीय संप झाला. त्याचबरोबर शूफॅक्टरीतील २००० कामगारांचा संप, भारती इलेक्ट्रीकल वर्क्स मधला १६०० कामगारांचा संप, ट्राम वर्क्सचा संप, इत्यादी अनेक संप बोनस, भत्ते वगैरे मागण्यासाठी झाले. कलकत्ता कॉर्पोरेशनच्या ८००० कामगारांनी स्वस्त धान्य पूरवठ्यासाठी याच काळात संप केला. नागापूरला एम्प्रेस मिल, मॉडेल मिल, बंगलोरची कापड गिरणी, इन्दूर येथील सात गिरण्या येथेही संप झाले. ऑक्टोबर १९३९ मध्ये कानपूरला ३,००० कामगार संपावर गेले. आराम ऑईल कंपनीच्या दिग्बोई कारखान्यात १९३९ मध्ये आठ महिने संप चालू होता. वरील सर्व संप महागाई भत्ता, वेतन वाढ, काढून टाकलेल्या कामगारांना पुन्हा कामावर घेणे अशा विविध कारणासाठी झाले.

### मुंबई प्रांतात झालेले वेगवेगळे संप :

१९४१ ते १९४३ या काळात अनेक ठिकाणी लहान-मोठे संप झाले. ११ फेब्रुवारी १९४१ रोजी कुर्ला येथे एच.आर.कोलटे यांच्या नेतृत्वाखाली कुर्ल्यामधील २०० कामगारांची मिटींग झाली. मिटींगचा विषय गिरणी मालक आपल्या मीलमध्ये कामगारांची संख्या कमी करण्याचा विचार करीत आहेत हा होता. असे असले तरी एच.आर.कोलटे यांनी कामगारांना संपावर न जाण्याचा सल्ला दिला. [७] परंतु न्यु मिल, कुर्ला या मिलमधील प्रशासनाच्या व मालकाच्या अन्यायामुळे कामगारांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष व संताप निर्माण झाला. याचे मुख्य कारण म्हणजे मिल प्रशासनाकडून कामगार कपात त्याबरोबर रोज रोजगार कपात करण्यात येणे होते. मिल प्रशासनाने औद्योगिक वाद कायदा (Industrial Disputes Act) १९३९ नुसार अगोदरच २०० कामगारांना नोटीस काढण्यात आल्या होत्या.[८] २७ मे १९४१ रोजी २०० कामगारांच्या कपातीची नोटीस कामगारांना मिळाली. त्याचबरोबर काही कामगारांच्या मजूरीमध्ये ही कपात होणार होती. ही बातमी जेव्हा कामगारांना कळली तेव्हा विण कामगार व चरखा कामगार मिळून जवळ-जवळ ७०० कामगार २८ मे १९४१ या दिवसापासून संपावर गेले. आर.एस.निंबकर व के.एन.जोगळेकर यांनी या संपाचे नेतृत्व केले. संप सुरु होऊन जवळ-जवळ तीन आठवडे झाले तरी परिस्थीतीमध्ये काहीही बदल झालेला नव्हता. एन.एम.जोशी त्याचबरोबर अन्य पाच कामगार पुढाऱ्यांनी जवळ-जवळ सहा मिटींगा घेतल्या. त्यांनी संप करणाऱ्या कामगारांना जोपर्यंत कामगारांच्या मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत संप चालू ठेवावे असे सांगितले. त्याचबरोबर त्यांनी या संप काळात मील मधील परिस्थीती वातावरण शांत ठेवावे असे ही सांगितले. [९]

२१ जुलै १९४१ पासून Pioneer Chromate Works या कुर्ला मधील एका लहान कारखान्यातील कामगार संपावर गेले. ही पन्नास कामगारांची छोटीशी फॅक्टरी होती. या संपाचे कारण रोजगार होता. कामगारांची मागणी होती की, दररोज १० आणि १४ आणे पगार मिळण्याऐवजी दरमहा ३० ते ४० रुपये पगार मिळावा. या सर्व कामगारांना लाल बावटा गिरणी कामगार युनियन बॉम्बे च्या श्रीमती अंबिका जोगळेकर यांनी पाठिंबा दिला. त्याचबरोबर या कामगारांची मागणी सरकारसमोर मांडण्याचे वचन त्यांनी कामगारांना दिले. [१०] २२ ऑगस्ट १९४१ रोजी अंबरनाथ मधील वुलन मील मधील १३ पठाणी वॉचमन ने मालकाविरुद्ध संप केला. त्यांच्या पगारवाढीची मागणी फेटाळून लावण्यात आल्यामुळे हा संप करण्यात आला. संप कर्त्यांने शांततामय मार्गाने संप केला. मॅनेजरने काही संप करणाऱ्या कामगारांना कामावरुन काढून टाकले. त्याचबरोबर मिलमधील क्वार्टरमधून त्यांना हुसकावून लावले. काढून टाकलेल्या वॉचमनच्या ऐवजी मुंबई मधील नवीन वॉचमन भरले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून काही सशस्त्र पोलिस तर काही बिगन शस्त्रधारक पोलिस गस्त घालू लागले. उप-विभागीय पोलिस इन्स्पेक्टर सर्व परिस्थीतीवर लक्ष ठेवून होते. नवीन वॉचमन व जुने कामावरुन काढून टाकलेले कामगार यांचा वाद होऊ नये याकडे त्यांचे लक्ष होते.[११] याच महिन्यात म्हणजे २८ ऑगस्ट १९४१ रोजी लाल बावटा गिरणी कामगार युनियनच्या वतीने कुर्ला येथे दोन सभा भरविण्यात आल्या. श्रीमती अंबिका जोगळेकर 'महागाई भत्ता' याबद्दल बोलल्या आणि श्रोत्यांना आग्रह केला की, त्यांनी युनियनमध्ये यावे. त्याचबरोबर अधिक महागाई भत्ता मिळविण्यासाठी संघर्ष चालू ठेवावा असे सांगितले. अहमदाबादचे श्री.खंडूभाई देसाई 'मजूर तक्रारी' विषयी बोलले आणि खुलासा केला की, मजूरांची अहमदाबाद मध्ये कशी अवस्था आहे. ते म्हणाले की, भांडवलदारांनी मजूरांच्या हिताकडे लक्ष दिले पाहिजे त्यांचा रोजगार वाढवून त्यांचे समाधान केले पाहिजे. कामगारांच्या चार मागण्या महत्त्वाचे आहेत असे त्यांनी सांगितले. त्या मागण्या अशा की, १) पंचवीस टक्के मजूरीत वाढ २) बोनस पद्धत ३) पगार प्रमाणीकरण ४) अधिक महागाई भत्ता त्यांनी कामगारांना एकत्रित होण्याचे आव्हान केले. त्यांनी आणखीन एक गोष्ट लक्षात आणून दिली की, अहमदाबादमधील कामगारांना क्वचित प्रसंगीच संपावर जावे लागते कारण ते समाधानी आहे. याप्रसंगी जवळ-जवळ ५०० लोक उपस्थित होते. [१२]

२३ ऑक्टोबर १९४१ रोजी Hattersley मील घाटकोपर या मील मधील अ आणि ब लुम विभागातील ३२१ कामगार संपावर गेले. हा संप कामगारांनी काही मागण्या मान्य करवून घेण्यासाठी केला. त्या मागण्यामध्ये प्रमुख मागण्या ८०% महागाई भत्ता मिळावा, कामावरुन कमी केलेल्या तीन कामगारांना कामावर परत घ्यावे, जास्त वेळ काम मिळावे अशा होत्या. एक आठवडा झाला तरी संप चालूच होता. संपामधील कामगाराची कारखान्यात हळूहळू उपस्थिती वाढू लागली. कामावरुन काढून टाकलेले कामगार इतर कामगारांना काम बंद ठेवण्यासाठी चेतवत होते. त्यांना २७ ऑक्टोबर १९४१ रोजी पोलिसांनी अटक केली. त्यांच्यावर रेसिडेंट मॅजिस्ट्रेट, कुर्ला येथील कोर्टात केस करण्यात आली. संप जरी चालू असला तरी मिल पूर्ण क्षमतेने चालू होती. मिल प्रशासनाने २०० नवीन कामगार भरती केले. [१३] २ नोव्हेंबर

१९४१ रोजी व्हिले पारले येथील श्री.इंद्रवदन एम.ओझा यांनी गिरणी कामगार संघ कुर्ला यांच्या माध्यमातून सार्वजनिक सभेचे आयोजन केले. या सभेचा मुख्य विषय 'औद्योगिक विवाद' हा होता. यावेळी श्री.इंद्रवदन एम.ओझा म्हणाले की, मुंबई मधील सरकारी कामगार कार्यालय कामगारांच्या हिताचा विचार करत नाही. लेबर ऑफीस कामगाराच्या कल्याणासाठी, त्यांच्या मागण्यासाठी कामगारांचे नेतृत्व करीत नाही. कामगारानां त्यांचा हक्क मिळवायचा असेल तर कामगारांना एक झाले पाहिजे. या सभेत चार ठराव पास झाले. ते असे १) कामगारांच्या वेतनात वाढ करावी २) प्रत्येक मिलमध्ये वेतनाचे प्रभावीकरण करावे २) नफ्यातून कामगारांना बोनस द्यावा आणि शेवटचा ठराव अन्न भत्ता वाढवावा. [१४]

१६ नोव्हेंबर १९४१ रोजी गिरणी कामगार संघ यांच्या नेतृत्वाखाली १०० कामगारांच्या उपस्थितीत कुर्ला येथे सभा झाली. या सभेस कुर्ल्यामधीलच एच.आर.कोलटे व मुंबई मधील डी.बी.चिटणीस उपस्थित हाते. कुर्ल्यामधील स्वदेशी मिल मधील चालू असलेल्या संपाविषयी ते म्हणाले. स्वदेशी मिल मधील कामगारांना खूप कमी पगार मिळतो. जीवनावश्यक वस्तूच्या किंमती वाढलेल्या आहेत. मिल मालकांना वाढलेल्या महागाईमुळे खूप फायदा होतो. परंतु मिल मालक नफा जरी वाढला असला तरी कामगारांचे वेतन वाढवत नाहीत. म्हणूनच विणकाम विभागामधील कामगारांनी संप केले. या संपाविरुद्ध मिल व्यवस्थापनाने कायद्यानुसार संपावर जाण्याविरुद्ध तक्रार केली आहे. शेवटे, कोलटे यांनी जास्तीत जास्त कामगारांनी गिरणी कामगार संघात सामिल व्हावे असे आवाहन केले. डी.बी.चिटणीस यांनी जवळपास हेच विषय घेऊन भाषण केले. यानंतर कुर्ल्यामध्ये एच.आर.कोलटे व डी.बी.चिटणीस यांनी तीन जाहीर सभा घेतल्या. एच.आर.कोलटे यांनी १५ फेब्रुवारी १९४२ रोजी गिरणी कामगार संघातर्फे सभेचे आयोजन केले. या सभेला लाल बावटा गिरणी कामगार युनियनचे लालाजी पेंटसे व सदानंद भिडे उपस्थीत होते. यांनी आपल्या भाषणात महागाई भत्ता आणि कामगारांचा बोनस या विषयावर भाषण केले. [१५]

२४ मार्च १९४२ रोजी पारले कंपनीतील कामगारांनी एक युनियन तयार केली. त्याचे नाव 'बिस्कीट वर्कर युनीयन, व्हिले पारले' (Biscuits Workers Union, Vile Parle) होते. या कंपनीतील कामगारांच्या तक्रारी, गाऱ्हाणी, समस्या, मागण्या ह्या गोष्टी पुढे सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यकारीणी तयार करण्यात आली.

अध्यक्ष-श्री.सावज कृष्णाजी दळवी (विले पारले)

सचिव-श्रीमती अंबुताई जोगळेकर (दादर-मुंबई)

सहसचिव-श्री.दत्तात्रय भिकाजी शिवाळकर (विलेपारले)

सभासद-४०० कामगार [१६]

पारले प्रोडक्ट मध्ये मे १९४२ मध्ये संप झाला. जवळजवळ १०० लोक संपावर गेले. कंपनीने नवीन लोकांना भरती करुन कंपनी सुरु केली.

**संदर्भ सादने :**


१. सेन सुकोमल, भारतातील कामगार चळवळ, पृ. २४०, नागरी सेवा प्रबोधिनी, (मंत्रालय) मुंबई, डिसेंबर २०००.
२. Maharashtra Archives, - Home Department (Special), File No. ५५० (२३)- C, पृ. S-२५.
३. कित्ता, पृ. S-२७.
४. कित्ता, पृ. S-७५.
५. जनता, ८ जूलै १९३९, पृ. ७.
६. सेन सुकोमन, उपरोक्त, पृ. २४५.
७. Maharashtra Archives, Home Department (Special), File No. ८०० (७४) (२) III, १९४१-४३, पृ. S-१३.
८. कित्ता, पृ. S-१६.
९. कित्ता, पृ. S-३५.
१०. कित्ता, पृ. S-४२.
११. Maharashtra Archives, Home Department (Special), File No. - ८०० (७४) (८) III, पृ. S-७१, S-७२.
१२. Maharashtra Archives, Home Department (Special), File No. - ८०० (७४) (२) III १९४१-४३, पृ. S-४७, S-४८.
१३. कित्ता, पृ. S-५८.
१४. कित्ता, पृ. S-६०.
१५. कित्ता ,पृ. S-६४, S-६८, S-६९.
१६. कित्ता, पृ. S-८५.